# उजळती वाट

वाच. स्वर्णलता भिशीकर



आयुष्यात ‘मोठ्ठं व्हावं, पराक्रम करावा, नाव कमवावं’ असं शालेय वयात प्रत्येकालाच वाटत असतं. हे वाटणं विरून न जाता ते वास्तवात उतरवण्यासाठी आणि फक्त ‘स्वार्था’पुरतं न जगता, अनेकांच्या उपयोगी पडणारं आयुष्य जगण्यासाठी शालेय वयात निश्चयपूर्वक काही व्रतांचा अंगीकार करायला हवा. यासाठी ज्ञान प्रबोधिनी अनेक वर्षांपासून विद्याव्रत संस्कार योजत आली आहे.

विद्यार्थ्यांना या व्रतांची ओळख व्हावी आणि त्याचे आचरण कसे करावे हे त्यांना कळावे म्हणून ‘उजळती वाट’ ही लेखमाला छात्र प्रबोधनमध्ये प्रकाशित झाली.

‘एका शिक्षिकेने एका विद्यार्थ्याला लिहिलेली जिव्हाळ्याची पत्रं’ हे या लेखनाचे स्वरूप आहे. त्याचेच हे छोटेखानी पुस्तक!

कुमार वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना आयुष्याची पायाभरणी करण्यासाठी हे पुस्तक उपयोगी पडेल.

या पुस्तकाच्या आधारे विद्यार्थ्यांमध्ये विकासोन्मुख बदल घडविण्यासाठी पालक शिक्षकांना हे पुस्तक निश्चित मदत करेल.

व्यक्तिविकसनपर
छात्र प्रबोधन प्रकाशन, पुणे
₹ ५०

# ॥ उजळती वाट ॥

**(विद्याव्रत संस्कारातील ६ व्रतांवर आधारित लेखांचे संकलन)**

**लेखिका**
वाच. स्वर्णलता भिशीकर

**छात्र प्रबोधन**
**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३०
www.chhatraprabodhan.org

# उजळती वाट

(विद्याव्रत संस्कारातील ६ व्रतांवर आधारित छात्र प्रबोधनमधील लेखांचे संकलन)


- **प्रकाशक व मुद्रक**
  प्रा. महेन्द्र सेठिया
  कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ४११०३०.
  email - mahendra.sethiya@jnanaprabodhini.org


  © स्वामित्व प्रकाशकाच्या स्वाधीन


- **लेखिका** : वाच. स्वर्णलता भिशीकर


- **अक्षरजुळणी** – छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे
  email - chhatraprabodhan@jnanaprabodhini.org
- **मुद्रित शोधन** – उदय हर्षे
- **मुखपृष्ठ व आतील चित्रे** – राहुल देशपांडे
- **प्रथम आवृत्ती** : राष्ट्रीय सौर पौष, शके १९३८, जानेवारी २०१७
  **तिसरे पुर्नमुद्रण** : राष्ट्रीय सौर ज्येष्ठ, शके १९४८, जून २०२६
- **ISBN : 978-93-49735-00-2**
- **किंमत : ₹ ५०**
  (२५ किंवा त्यापेक्षा अधिक प्रतींची मागणी केल्यास पुस्तक ₹ ४० या सवलतीच्या दरात मिळेल.)
- **वितरण**
  छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०
  ☎ (020) 24207 108/175
  ऑनलाइन खरेदीसाठी jpprakashane.org

***'Ujalati Vat'***

(Six Vows in Vidyavrat Sanskar)

(छात्र प्रबोधन मासिकात २०११ – २०१२ या कालावधीत प्रसिद्ध झालेली लेखमाला या पुस्तकात पुनर्मुद्रित केली आहे.)

# लेखिकेचे मनोगत

गेली पंचेचाळीस वर्षं मी शिशु, शालेय मुलं, युवक-युवती यांच्यासोबत काम करीत आहे. हे काम मला अपरंपार आनंद देऊन गेलं आहे आणि अनंत गोष्टी शिकवूनही गेलं आहे. शिक्षक किंवा शिक्षिका या मुलांना मित्र किंवा मैत्रीण म्हणून, दादा किंवा ताई म्हणून जास्त आवडतात. अशा प्रकारे केलेला संवादही त्यांना आवडतो, मानवतो.

ज्ञान प्रबोधिनीत विद्याव्रत संस्काराच्या निमित्ताने शिक्षक-शिक्षिका मुलांशी संवाद करतात. हा संस्कार फार हृद्य असतो. त्याची पूर्वतयारीही खूप चित्त घालून करावी लागते. हा संस्कार घेण्यासाठी आधीच्या संवादांमधून योग्य मनोभूमिका तयार होते. हे संवाद पत्ररूपाने प्रकाशित करावेत, असं छात्र प्रबोधनच्या संपादकांनी ठरवलं. मलाही कल्पना आवडली.

आपल्या शरीराची, मनाची, बुद्धीची ओळख करून घेणं, त्यांचा विकास कसा करायचा हे आपलं आपल्याला कळणं महत्त्वाचं असतं. आठवी-नववीच्या कोवळ्या वयातच देश आणि देव यांच्याशीही नातं जुळणं आवश्यक असतं. शरीर-मनाच्या विकसित शक्ती देशाचे प्रश्न सोडवण्यासाठी उपयोगात आणायच्या असतात. या सूत्रांवर ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक कै. डॉ. आप्पा पेंडसे यांनी या संस्काराची रचना केली.

अरुणाचल, नाग प्रदेशातील ख्रिस्ती मुलांनी आणि दक्षिण मराठवाड्यातल्या मुस्लिम मुलांनीही मोठ्या प्रेमाने हा संस्कार ग्रहण केला आहे. सर्व जाती, धर्म, पंथांतील मुला-मुलींसाठी प्रबोधिनी हा संस्कार करते आणि त्याचे शुभ परिणाम आजवर दिसून आले आहेत.

उद्याच्या भारताला स्वच्छ चारित्र्याचं, व्यसनमुक्त आणि प्रेरणेने संपन्न असं युवक-युवतीचं बळ उभं करायचं आहे. त्यासाठी विद्याव्रत संस्कार फार महत्त्वाचा आहे. चारुहास नावाच्या एका विद्यार्थ्याला लिहिलेल्या या पत्रांतून भारतीय युवाशक्तीशीच संवाद केला आहे. कुणीही शिक्षकाने आपल्या विद्यार्थ्यांना भोवती घेऊन बसावं. वर्गात किंवा झाडाखाली, नदीकाठी आणि ही पत्रं त्यांच्यासमवेत वाचावीत; त्यावर बोलावं, मुलांनीही बोलावं, त्यातून मुलांची उमज वाढत जावी. असं झालं तर या छोट्या पुस्तकाचं सार्थक झालं असं म्हणू या.

शुभेच्छापूर्वक,
लताताई

# लेखिकेचा परिचय



**नाव** – वाच. स्वर्णलता भिशीकर
(१९५१–२०२५)
**शिक्षण** – एम्.ए.पीएच्.डी (मानसशास्त्र)

♦ **पीएच्.डी (शैक्षणिक मानसशास्त्र)** प्रबंधाचा विषय – 'वाचन कौशल्यांचा विकास',
**युवक–युवती संघटन** – ज्ञान प्रबोधिनीद्वारा आयोजित
विविध उपक्रमांच्या माध्यमातून युवती गटात सामाजिक व राष्ट्रीय जाणिवेची जागृती; स्त्रियांवरील अत्याचारांविरुद्ध आंदोलने; पंजाब सद्भाव यात्रेतील युवती गटाचे प्रभावी नेतृत्व.

**संस्थाकार्य** – अध्यापन, मानसशास्त्रीय संशोधन; १९८९ पासून सोलापूर व हराळी येथील ज्ञान प्रबोधिनीच्या शाखांमधील विविध उपक्रमांचे संचालन; सोलापूर जिल्ह्यात साक्षरता व बालकामगार प्रकल्पांवर विशेष काम.

**लेखन** – प्रबोधिनीत, 'गीतमंचा' मध्ये व आकाशवाणीवर गायली जाणारी अनेक गीते, संगीतिका;
- कै. डॉ. पेंडसे यांच्यासह 'श्रीमाताजी–श्रीअरविंद काय म्हणाले' (विचार संकलन), ज्ञान प्रबोधिनीच्या पुनर्रचित संस्कार पोथ्यांच्या लेखनात साहाय्य व स्वतंत्रपणे लेखन
- 'यात्रा एका धुमसत्या मुलखाची' (गद्य)–पंजाब यात्रेचा वृत्तांत,१९८४
- 'ए न्यू एक्सपरिमेंट इन् एज्युकेशन' (खंड १, २ व ३) – ज्ञान प्रबोधिनीसंबंधीचे साहित्य – लेखन व संपादन
- 'देवचाफे' (कविता संग्रह) – विश्वमोहिनी प्रकाशन
- 'गीतांजली' या रवींद्रनाथ ठाकुर यांच्या काव्यसंग्रहाचा भावानुवाद;
- 'हिंदुतेजा जाग रे' – स्वामी विवेकानंदांच्या इंग्रजी विचार संकलनाचा अनुवाद, विवेकानंद केंद्र प्रकाशन;
- 'उपनिषदांचे अंतरंग' – स्वामी रंगनाथानंदांच्या इंग्रजी पुस्तकांचा अनुवाद. रामकृष्ण मठ प्रकाशन.
- 'साप्ताहिक बारावी', 'तरुण भारत', 'सकाळ', इ.मध्ये शैक्षणिक, सामाजिक, समीक्षात्मक, ललित विषयांवर अनेक लेख अथवा लेखमाला, विविध संस्थांमध्ये व्याख्याने
- गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध आणि अन्य संतवाङ्मयावर प्रवचने; सामाजिक कार्यासाठी विविध पुरस्कार प्राप्त.



# अंतरंग


- उजळती वाट ........................................ ६
- युक्ताहार विहार........................................ ११
- इंद्रिय संयमन ........................................ १५
- दैनंदिन उपासना........................................ १९
- स्वाध्याय प्रवचन ........................................ २४
- सद्‌गुरुसेवा ........................................ २९
- राष्ट्रअर्चना........................................ ३४
- निरोप घेताना... ........................................ ४०
- नियम पाळावे........................................ ४५
- विद्याव्रतातील श्लोक........................................ ४७
- पद्य... ........................................ ४८